0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.२२/१२/२०१० रोजी प्राप्त झालेले कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१४०/२०१०/जा.९५४, दि.२३/१२/२०१०, १०/०१/२०११, ३/०२/२०११, १७/०२/२०११, २३/०३/२०११, १९/०४/२०११.

३) वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वर्सोवा पोलीस ठाणे यांचे दि.२०/०१/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

४) पोलिस उप निरीक्षक, वर्सोवा पोलीस ठाणे यांचे दि.०१/०३/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

५) पोलिस उप निरीक्षक, वर्सोवा पोलीस ठाणे यांचे दि.३१/०३/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

६) पोलिस उप निरीक्षक, वर्सोवा पोलीस ठाणे यांचे टपालामार्फत प्राप्त दि.०३/१२/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन व त्यासोबत अशोक (मुनीराज) रामबली दुबे यांचा दि.११/११/२०११ रोजी नोंदविण्यात आलेला पुरवणी जबाबाची छायांकित प्रत.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१४०/२०१०/जा ४६
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : २५/०१/२०१२.

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

मांडवी गल्ली बंदर रोड, वर्सोवा, जेपी पोलिस चौकी, बीट क्र. २ च्या मागे असलेल्या छोटया गोदामसदृश्य घरामध्ये शासन नियंत्रित निळया केरोसिनचा साठा केल्याची खात्रीलायक खबर उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांना दिनांक १९/१२/२०१० रोजी मिळाल्यावरुन त्या कार्यालयातील अधिकारी यांनी पंचासह उक्त ठिकाणी छापा टाकून तपासणी केली. सदर गोदामसदृश्य घरामध्ये उपस्थित इसमास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव महेंद्र नकलू यादव असे सांगितले. घटनास्थळी ३५ लिटर क्षमता असलेल्या ७६ प्लॅस्टिक कॅन मध्ये आढळून आलेले निळे केरोसिन कोणाच्या मालकीचे आहे, याबाबत विचारणा केली असता. सदर शासन नियंत्रित निळे केरोसिन हे त्याचा मालक अशोक (मुन्नीराज) दुबे यांनी बोटीसाठी इंधन म्हणून काळ्याबाजारात विकण्याकरिता साठविल्याचे सांगितले. याबाबत आरोपीताकडे कोणत्याही प्रकारचे वैध देयके, कागदपत्र नव्हते.

सदर गोडावून कोणाच्या मालकीचे आहे, याबाबत आरोपीताकडे विचारणा केली असता. गोडावून मालकाचे नांव माहित नसल्याचे तसेच त्याचे मालक दुबे यांचे फक्त नाव माहित असून, तो मढ येथे राहतो. मात्र

त्याचा पूर्ण पत्ता माहित नसल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर आरोपीताकडे अधिक चौकशी केली असता, शासननियंत्रित निळे केरोसिन खरेदी विक्रीचे काम मालक दुबे पाहत असून, गेल्या १० दिवसांपासून केरोसिनचे डबे उतरविण्याचे व खरेदी करणाऱ्यांना देण्याचे काम दुबे यांच्या आदेशानूसार करीत असल्याचे सांगून, त्या मोबदल्यात २५ डबे उतरविण्याचे रुपये १००/- याप्रमाणे मालकाकडून पैसे मिळत असल्याचेही सांगितले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर शासन नियंत्रित दराने वितरीत होणारे निळे केरोसिन अवैधमार्गाने मिळवून, स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी व्यावसायिक दृष्टीने बेकायदेशिररित्या साठवणूक केल्याचे सकृतदर्शनी सिध्द झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९, १० (२) दि बॉम्बे रेशनिंग एरिया शेडयुल कमोडिटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रिब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ४, ५, ६, ७, ८ (३) दि केरोसिन (रिस्ट्रीक्शन ऑन युज अॅण्ड फिक्सेशन ऑफ सिलिंग प्रायजेस) ऑर्डर, १९९३ चे कलम ३ तसेच (४) महाराष्ट्र सार्वजनिक वितरण व्यवस्था (पीडीएस) केरोसिन घाऊक विक्रेता, अर्ध घाऊक विक्रेता व हॉकर्स (अनुज्ञापन) आदेश २००९ चा कलम ३ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द वर्सोवा पोलिस स्टेशन, मुंबई येथे विशेष स्थानिक गुन्हा नोंद क्र. २५/२०१० दि.१९/१२/२०१० अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | निळे केरोसिनचा साठा | २६६० लिटर | १,०१,०८०/- |
| २ | प्लॅस्टिक कॅन (निळे केरासिनने भरलेले) | ७६ नग | ११,४००/- |
| ३ | रिकामे प्लॅस्टिक कॅन | १ नग | १५०/- |
| | | एकूण | १,१२,६३०/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी, मुंबई यांनी वाचावे क्र. १ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. ०७/०१/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/०१/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलीस अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी म्हणून पुढील सुनावणी दि.२०/०१/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/०१/२०११ रोजीच्या सुनावणीस वर्सोवा पोलिस ठाणेचे तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरिक्षक श्री. नारायण काशिराम माडकर हे उपस्थित राहिले व त्यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे वरील वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीसही आरोपी/अपचारी हे उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.०२/०२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०२/०२/२०११ रोजीच्या सुनावणीसही आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुढील संधी म्हणून पुढील सुनावणी दि.१०/०२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १०/०२/२०११ रोजीच्या सुनावणीसही आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. तसेच जप्त मुद्देमाल केरोसिन हे कोणाच्या मालकीचे आहे, याबाबत तपासात काय निष्पन्न झाले, याचा अहवाल सुनावणीच्या दिवशी तपासी पोलिस अधिकारी यांना सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले होते. तथापी, तपासी पोलिस अधिकारी सदर सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची शेवटची संधी म्हणून पुढील सुनावणी दि.०१/०३/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०१/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस जप्त मुद्देमालाचे मालक अशोक (मुनीराज) दुबे उपस्थित राहिले. त्यांनी सदर जप्त मुद्देमाल त्यांचा नसल्याचे सांगितले. परंतू लेखी खुलासा सादर केला नाही. तसेच सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. नारायण माळकर उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ४ अन्वये लेखी अभिवेदन सादर करुन आरोपी महेंद्र यादव गावी गेला असल्याने तसेच गोडावून जागा मालक नसल्याने नोटीस बजावता आली नसल्याचे सांगितले. जप्त मुद्देमाल कोणाच्या मालकीचा आहे, याबाबतही तपासी पोलिस अधिकाऱ्याला खुलासा न करता आल्याने प्रकरणी गोडावून मालक तसेच जप्त मुद्देमालाच्या मालकीबाबत चौकशी करण्यास थोडा अवधी मिळावा म्हणून पोलिसांनी विनंती केली. उपरोक्त विनंतीस अनुसरुन प्रकरणी पुढील सुनावणी दि.१९/०३/२०११ रोजी ठेवण्यात आली व सुनावणीबाबत पोलिसांनी सर्व संबंधितांना कळविण्याबाबत पोलिसांना सुचित करण्यात आले.

दिनांक १९/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी महेंद्र यादव उपस्थित राहिले नाहीत. जप्त केरोसिन कोणाच्या मालकीचे आहे, तसेच ते कोणाकडून प्राप्त केले ? याबाबत अद्यापही निष्पन्न झाले नसल्याने, प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक ३१/०३/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ३१/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरिक्षक श्री. नारायण के. माळकर उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ५ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तथापी, सदर सुनावणीस महेंद्र यादव उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.१९/०४/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १९/०४/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी महेंद्र यादव हे उपस्थित राहिले नाहीत. सबब, अंतीम सुनावणी दि.२८/०४/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २८/०४/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी महेंद्र यादव उपस्थित राहिले नाहीत. तथापी, पोलिस अधिकारी यांनी दि.३१/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, सदर जप्त मुद्देमाल केरोसिन हे कोणाच्या मालकीचे आहे व कोणाकडून प्राप्त केले आहे, याबाबत आरोपीतांकडे केलेल्या चौकशीत जप्त निळे केरोसिन हे त्याने त्याचे नातेवाईक, परिचयाच्या व्यक्ती, शेजारी यांच्याकडून रेशनिंग दुकानातून सरकारी दराने खरेदी करुन त्याचा साठा करुन ते डिझेल बोट चालकांना विक्री करतात असे सांगितले असल्याचे नमूद केले आहे. प्रस्तूत प्रकरणी २६६० लिटर एवढया मोठ्या प्रमाणावर आरोपी यांनी शासन नियंत्रित केरोसिनची साठवणूक केली असतांना, आरोपींनी केलेले उपरोक्त विधान वस्तूस्थितीवर आधारीत नाही. सबब, याबाबत पुन्हा एकदा शहानिशा करुन अहवाल सादर करण्याकरिता पोलिस उप आयुक्त यांना या कार्यालयाचे दि.०३/०५/२०११ रोजीच्या पत्रान्वये व तद्नंतर दि.१०/०६/२०११ व १४/०९/२०११ रोजीच्या स्मरणपत्रान्वये कळविण्यात आले.

तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरिक्षक श्री. नारायण के. माळकर यांनी वाचावे क्र. ६ अन्वये अहवाल व आरोपी अशोक (मुनीराज) रामबली दुबे यांचा पुरवणी जबाब सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

दिनांक २०/०१/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित वर्सोवा पोलिस ठाणेचे तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरिक्षक श्री. नारायण काशिराम माडकर यांनी सादर केलेल्या वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे लेखी अभिवेदनात, जप्त मुद्देमाल सुरक्षेकामी पोलिस ठाणे गोडावूनमध्ये न ठेवता आवारामध्ये सिलबंद करुन ठेवले आहेत. कारण पोलिस ठाणेच्या गोडावूनमध्ये यापूर्वीच बरेचसे मुद्देमाल ठेवण्यात आले आहेत व तेथे अधिक मुद्देमाल ठेवणे शक्य नाही. तरी सदरचा मुद्देमाल केरोसिन हा ज्वालाग्राही द्रावण असल्याने तो पोलिस ठाणे आवारात मोकळे ठेवण धोक्याचे आहे. त्यामुळे कोणतीही अनुचीत घटना घडणे शक्य आहे. तरी सदरचा मुद्देमाल केरोसिन हे आपल्या नियमानुसार रितसर ताब्यात घेऊन त्याची कायदेशिररित्या पुढील विल्हेवाट लावावी, अशी विनंती केली आहे.

दिनांक ०१/०३/२०११ व ३१/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित वर्सोवा पोलिस ठाणेचे तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरिक्षक श्री. नारायण काशिराम माडकर यांनी सादर केलेल्या अभिवेदनात, प्रस्तूत गुन्ह्यातील आरोपीतांकडे सदर जप्त माल केरोसिन कोणाच्या मालकीचे आहे व कोणाकडून प्राप्त केले आहे. याबाबत चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की, सदरचा माल हा त्याने त्याचे नातेवाईक, परिचयाच्या व्यक्ती,

शेजारी यांच्याकडून रेशनिंग दुकानावरुन सरकारी दराने खरेदी करुन त्याचा साठा करुन ते डिझेल बोट चालकांना विक्री करतात. सदरचा माल अन्य कोणा एजंटकडून गैरमार्गाने घेत नसल्याचे सांगितले व सदरचा धंदा ते स्वमर्जीने उदरनिर्वाहासाठी करीत असल्याचे सांगितले. तसेच गोडावूनची जागा ही शासन नियंत्रित पडीत जागा असुन त्यामध्ये बेकायदेशिर झोपड्या बांधलेल्या आहेत व त्यावर कोणाचीही मालकी नसून सदर झोपड्या वजा गोडावूनचा वापर यातील आरोपीताने नमूद केरोसिन ठेवण्यासाठी केला असल्याचे समजते. तरी सदर प्रकरणी बजावण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसाच्या प्रती महेंद्र नकलू यादव हा त्याचे रहाते गांवी उत्तरप्रदेश येथे गेला असून त्याचेवर प्रत बजावता आली नाही. तसेच आरोपी अशोक (मुनीराज) दुबे, जप्त मुद्देमालाचे मालक यांना दि.२६/०२/२०११ रोजी प्रत देऊन साक्षकामी हजर राहण्याबाबत सक्त सुचना दिल्या आहेत. तसेच आरोपी गोडावूनचे मालक कोणी उपलब्ध नाही. कारण सदर झोपडी वजा गोडावून हे शासन नियंत्रित जागेत अनधिकृत झोपड्या असून त्या कोणाच्या मालकीच्या नाहीत. तरी सदरची प्रत बजावण्यात आली नाही. तरी सदरचा मुद्देमाल केरोसिन हे आपल्या नियमानुसार रितसर ताब्यात घेऊन त्याची कायदेशिर रित्या पुढील विल्हेवाट लावावी, अशी विनंती केली आहे.

तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरिक्षक श्री. नारायण के. माळकर यांनी दि.०३/१२/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, यातील आरोपीत महेन्द्र नकलू यादव व अशोक (मुनीराज) रामबली दुबे हे राहते गांवी असलेने तपास करणेस विलंब झाला. तरी यातील केरोसिन मालक अशोक दुबे हे दि.११/११/२०११ रोजी बोलवल्यावरुन समक्ष पोलिस ठाण्यात हजर झाल्याने सदर केरोसिन साठ्याबाबत कसून चौकशी केली असता त्याने सांगितले की, ते सदर परिसरांत पूर्वीपासून राहतात. त्यामुळे त्यांचा चांगला जन परिचय आहे. तेथील सर्व नातेवाईक, शेजारी, रहिवाशी परिचीत आहेत. त्यापैकी बरेच लोक गॅसचा वापर करतात. केरोसिन वापरत नाहीत. त्यामुळे त्यांचे रेशनकार्डावर मिळणारे केरोसिन रेशनिंग दुकानातून घेऊन ते बेकायदेशिर विनापरवाना साठवूण त्याची विक्री जास्त भावाने बोट चालकांना करीत असतात. तसेच सदरचे केरोसिन तो कोणत्याही केरोसिन डिलर्स एजंटाकडून, एजन्सीकडून घेत नाही व त्यांचेशी त्यांचा संबंध नसल्याचे सांगितले आहे. तरी सदर प्रकरणातील जप्त केलेला केरोसिनचा साठा २६६० लिटर्सचे एकूण ७६ कॅन प्रत्येकी ३५ लिटर्स क्षमतेचे हे वारस मुद्देमाल नोंद क्र. १६७/१० अन्वये पोलिस ठाणेच्या ताब्यात असून ते सुरक्षेकामी गोडावूनमध्ये न ठेवता पोलिस ठाणे आवारामध्ये सिलबंद अवस्थेत ठेवण्यात आले आहेत. कारण गोडावूनमध्ये यापूर्वी बरेचसे मुद्देमाल ठेवण्यात आले आहेत व सदरचा मुद्देमाल हा ज्वालाग्राही असलेने ते गोडावूनमध्ये किंवा पोलिस ठाणेच्या आवारात उघड्यावर ठेवणे अतिशय धोकादायक आहे. तरी सदरचे मुद्देमाल शासन नियंत्रित निळे केरोसिन हे आपल्या नियमानुसार रितसर ताब्यात घेऊन त्याची बेकायदेशिर रित्या पुढील विल्हेवाट लावावी अशी विनंती केली आहे.

तपासी पोलिस अधिकारी, श्री. नारायण के. माळकर यांच्या समक्ष दि.११/११/२०११ रोजी अशोक (मुनीराज) रामबली दुबे यांनी दिलेल्या जबाबात, ते सदर परिसरात फार पूर्वी पासून राहत असल्याने त्यांचा चांगला

जनपरिचय असून सर्व नातेवाईक, शेजारी, रहिवाशी चांगले ओळखतात. त्यापैकी काही परिचयाचे लोक जे त्यांच्या घरी केरोसिनचा वापर करीत नाही व गॅसचा वापर करतात. त्यांच्या रेशनकार्डावर मिळणारे शासकीय केरोसिन हे रेशनिंग दुकानातून घेऊन त्याचा एकत्रितपणे साठा करुन ते प्रत्येकी ३५ लिटर क्षमतेच्या कॅनमध्ये भरुन सदरचे कॅन भागिरथी बिल्डिंगजवळ, जेटी पोलिस चौकीच्या मागे, वर्सोवा गांव येथील शासनाच्या जागेत बेकायदेशिरपणे बांधलेल्या घरामध्ये बंद करुन ठेवून सदरची बंद जागा घराचा मालक कोण आहे, याबाबत त्याला काहीच माहिती नाही. तसेच तो साठा करीत असलेला केरोसिन त्याने कोणत्याही केरोसिन एजन्सीकडून घेतले नाही किंवा त्यांना ओळखत नाही. सदर केरोसिन कॅनचे ने-आण करण्यासाठी त्यांनी एक नोकर नामे महेंद्र नकलू यादव यास ठेवले असून त्यास दररोज १००/- रुपये पगार देऊन त्या मोबदल्यात तो सदरचे संपूर्ण काम करीत असतो. दि.१९/१२/२०१० रोजी तो कामानिमित्त बाहेर असतांना नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई पथकाने त्याच्या नमूद केरोसिन ठेवलेल्या गोदामावर छापा मारला असता, तेथे महेंद्र नकलू यादव हा मिळून आला व त्यास नमूद पथकाने केरोसिन मुद्देमालासहित अटक करुन कारवाई केली व त्यानंतर त्याला स्वत:ला पोलिसांनी सदर गुन्ह्यात अटक केली असून सद्याते दोघेही जामिनावर मुक्त आहेत. सदरचे जप्त केरोसिन त्याने कोणताही केरोसिन डिलर्स, एजन्टाकडून किंवा एजन्सीकडून घेतले नाही व अशा कोणत्याही एजन्टाशी, एजन्सीशी किंवा डिलर्सशी त्याचा कोणताही संबंध नसून सदरचे केरोसिन त्याने बेकायदेशिररित्या विनापरवाना साठवणूक केली असून ही चूक त्याला मान्य असल्याचे नमूद आहे.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मांडवी गल्ली बंदर रोड, वर्सोवा, जेपी पोलिस चौकी, बीट क्र. २ च्या मागे असलेल्या छोटया गोदामसदृश्य घरामध्ये शासन नियंत्रित निळया केरोसिनचा साठा केल्याची खात्रीलायक खबर उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांना दि.१९/१२/२०१० रोजी मिळाल्यावरुन त्या कार्यालयातील अधिकारी यांनी पंचासह उक्त ठिकाणी छापा टाकून तपासणी केली. सदर गोदामसदृश्य घरामध्ये उपस्थित इसमास त्याचे नाव महेंद्र नकलू यादव असे सांगितले. घटनास्थळी ३५ लिटर क्षमता असलेल्या ७६ प्लॅस्टिक कॅनमध्ये आढळून आलेले निळे केरोसिन कोणाच्या मालकीचे आहे, याबाबत विचारणा केली असता. सदर शासन नियंत्रित निळे केरोसिन हे त्याचा मालक अशोक (मुन्नीराज) दुबे यांनी बोटीसाठी इंधन म्हणून काळ्याबाजारात विकण्याकरिता साठविल्याचे सांगितले. याबाबत आरोपीताकडे कोणत्याही प्रकारचे वैध देयके, कागदपत्र नव्हते. सदर गोडावून कोणाच्या मालकीचे आहे, याबाबत आरोपीताकडे विचारणा केली असता. गोडावून मालकाचे नांव माहित नसल्याचे तसेच

त्याचे मालक दुबे यांचे फक्त नाव माहित असून, तो मढ येथे राहतो. मात्र त्याचा पूर्ण पत्ता माहित नसल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर आरोपीताकडे अधिक चौकशी केली असता, शासननियंत्रित निळे केरोसिन खरेदी विक्रीचे काम मालक दुबे पाहत असून, गेल्या १० दिवसांपासून केरोसिनचे डबे उतरविण्याचे व खरेदी करणाऱ्यांना देण्याचे काम दुबे यांच्या आदेशानूसार करीत असल्याचे सांगून, त्या मोबदल्यात २५ डबे उतरविण्याचे रुपये १००/- याप्रमाणे मालकाकडून पैसे मिळत असल्याचेही सांगितले. यावरुन संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन निळे केरोसिनने भरलेले ७६ प्लॅस्टिकचे कॅन व एक रिकामा कॅन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दिनांक ०१/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस जप्त मुद्देमालाचे मालक अशोक (मुनीराज) दुबे यांनी उपस्थित राहून सदरचा जप्त मुद्देमाल त्यांचा नसल्याचे सांगितले. परंतू लेखी निवेदन सादर केले नाही. तसेच इतर आरोपी यांना पुरेशी संधी देऊन देखील ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. तथापी, तपासी पोलिस अधिकारी यांनी सादर केलेले लेखी अभिवेदन व अहवालाचे अवलोकन करता सदरचा जप्त करण्यात आलेला निळे केरोसिनचा साठा हा आरोपी अशोक (मुनीराज) दुबे यानी त्याच परिसरातील त्याचे नातेवाईक व परिचयाच्या व्यक्तींच्या शिधापत्रिका वरील वितरीत होणारे अनुदानित दराचे निळे केरोसिन त्याने रेशन दुकानातून प्राप्त करुन सदरचा साठा बेकायदेशिररित्या साठवणूक व विक्री करीत असल्याचे नमूद केले आहे. तसेच आरोपी अशोक (मुनीराज) रामबली दुबे याने पोलिसांसमक्ष दि.११/११/२०११ रोजी दिलेल्या जबाबात ही बाब मान्य करुन गुन्हा कबूल केला आहे. यावरुन आरोपी यांनी संगनमताने शासन नियंत्रीत निळे केरोसिनची अवैधमार्गाने व अनधिकृतरित्या खरेदी - विक्री करुन, त्याची बेकायदेशीररित्या साठवणूक केल्याचे सिध्द होत आहे. सबब, प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वर्सोवा पोलिस स्टेशन, मुंबई येथे विशेष स्थानिक गुन्हा नोंद क्र. २५/२०१० दि.१९/१२/२०१० मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेले संपुर्ण एकूण २६६० लिटर निळे केरोसिनचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेले सदरचे निळे केरोसिन उपनियंत्रक शिधावाटप, ड-परिमंडळ कार्यालय, अंधेरी यांचे मदतीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांस, पोलीसांनी नियंत्रीत दराने विक्री करुन येणारी रक्कम पोलीसांनी शासनजमा करावी.

0008

३) जप्त करण्यात आलेले ७७ प्लॅस्टिक कॅन यांची पोलीसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक-ठेव-लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) महेंद्र नकलू यादव
२) अशोक (मुन्नीराज) दुबे, जप्त मुद्देमालाचे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वर्सोवा पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वर्सोवा पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यालन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई.

५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.